पाटोदा

# संचार

● वर्षे ४ थे ● अंक २६२ वा ● शुक्रवार दि. २० नोव्हेंबर २००९ ● पाने ४ ● किंमत एक रुपया

संस्थापक संपादक - स्व.विश्वकर्मा डोळसे | संपादक - विलास डोळसे

शुक्रवार दि.२० नोव्हेंबर २००९

# १०डिसेंबरला मुंबईत औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- हॅनोवर मिलानो फेअर्स इंडिया या कंपनीने यंदा मुंबईत 'मेगा इंडस्टियंल ट्रड फेअरस' अर्थात औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन केले आहे. दि. १० ते १३ डिसेंबर दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर (BEC), पश्चिम द्रूतगती महामार्ग, गोरेगाव (पू.) येथे आयोजित या महामेळाव्यात CeMAT India (मटेरियल्स हँडलिंग अॅण्ड लॉजिस्टिक्स), (मोशन, ड्राईव्ह अॅण्ड इंडस्ट्रियल बिल्डींग ऑटोमेशन), एनर्जी इंडिया (सोलूशन्स फॉर एनर्जी एफिशिएन्सी, रिन्युएबल एनर्जी अॅण्ड कॅप्टीव्ह पॉवर प्लान्टस्) ही चार प्रमुख प्रदर्शने भरवली जातील. अत्याधुनिक तंत्रज्ञान हे या महामेळाव्याचे प्रमुख आकर्षण आहे.

फ्लईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियातर्फे या महामेळाव्यात ऑटोमेशन किऑस्क उभारण्यात येणार आहे. फ्लूईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियाच्या सदस्य औद्यागिक संस्थांनी या महामेळाव्यात ऑटोमेशन तंत्रज्ञान आणि अॅप्लिकेशन ट्रनिंग संदर्भात माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महामेळाव्यात सहभागी होणाऱ्यांना तज्ज्ञांशी यापूर्वी जगात कुठेही या संकल्पनेचा वार करण्यात आलेला नाही.

याशिवाय लेन्झ कंपनीने तयार केलेला ८४०० फ्रिक्वेन्सीचा नवीन इन्व्हर्टर, ओमाल कंपनीचे अॅक्चुएटर्स आणि व्हाल्व्स, पीटर्स इंडू प्रोडक्ट कंपनीचे न्यूमॅटिक, हायड्रॉलिक, सेन्सर अॅण्ड ऑटोमेशन प्रोडक्ट, केबल अॅडाप्टर, सेन्सर कनेक्टर M8/M12 कनेक्टर मोल्डेड, सेन्सर कनेक्टर M8/M12 फील्ड अॅटॅचेबल, इलेक्ट्रॉनिक प्रेशर स्विच इ. स्टॅबिलस, सेन्टॉर्क, अॅटॉस स्पा कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रोहायड्रॉलिक्स आदिंचा या महामेळाव्यात समावेश असेल. पुरवठादार आणि ग्राहक कंपन्या या दोहोंनाही उद्योग जगतातल्या नवनवीन ट्रेंडसच्या माहितीची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे.